# <u>कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण</u>
## <u>अधिकारी व अनुशेष विशेष भरती मोहिम २०११</u>

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमधील वर्ग–१ व वर्ग–२ संवर्गातील राखीव/अराखीव **रिक्त** पदे आणि वर्ग–३ व वर्ग–४ संवर्गातील मागासवर्गीयांच्या अनुशेषाची रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून परिक्षेसाठी (लेखी/तोंडी) Maharashtra Knowledge Corporation Ltd. **(MKCL)** यांचेमार्फत **दिनांक ८/११/२०११** ते **दिनांक ७/१२/२०११** अखेर सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. भरतीबाबतची अधिक माहिती **MKCL** च्या **http://oasis.mkcl.org/kdmc2011** या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदरची वेबसाईट **दिनांक ८/११/२०११** पासून सुरु आहे.

| अनु क्रमांक | पदाचे नांव व वेतनश्रेणी ( * सामाजिक आरक्षणांतर्गत असलेल्या पदांमध्ये समांतर आरक्षणांतर्गत येणारी पदे सदरहू पदनामाच्या खाली कंसामध्ये दर्शविलेली आहेत.) | सामाजिक आरक्षण | | | | | | | | | एकूण पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा.भ.ज. | | | | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास वर्ग | खुला | |
| | | | | अ | ब | क | ड | | | | |
| **वर्ग– १** | | | | | | | | | | | |
| १ | **वैद्यकीय आरोग्य अधिकारी** (पे बॅड रु.१५६००–३९१०० ग्रेडवेतन रु.६६००) | – | – | – | – | – | – | – | – | १ | **१** |
| २ | **मुख्य वैद्यकीय अधिकारी** (पे बॅड रु.१५६००–३९१०० ग्रेडवेतन रु.६६००) | – | – | – | – | – | – | – | – | १ | **१** |
| ३ | **सिस्टीम मॅनेजर** (पे बॅड रु.९३००–३४८०० ग्रेडवेतन रु.४४००) | – | – | – | – | – | – | – | – | १ | **१** |
| ४ | **प्रकल्प व्यवस्थापक तथा आर.सी.एच. ऑफिसर** (पे बॅड रु.१५६००–३९१०० ग्रेडवेतन रु.६६००) | – | – | – | – | – | – | – | – | १ | **१** |
| **वर्ग–२** | | | | | | | | | | | |
| ५ | **प्रभाग क्षेत्र अधिकारी** (पे बॅड रु.९३००–३४८०० ग्रेडवेतन रु.४४००) | १ | १ | – | – | – | – | – | १ | १ | **४** |
| ६ | **उप कर निर्धारक व संकलक** (पे बॅड रु.९३००–३४८०० ग्रेडवेतन रु.४४००) | – | – | – | – | – | – | – | – | १ | **१** |
| ७ | **उप सचिव** (पे बॅड रु.९३००–३४८०० ग्रेडवेतन रु.४४००) | – | – | – | – | – | – | – | – | १ | **१** |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | **सहा. सार्वजनिक आरोग्य अधिकारी** (पे बॅड रु.९३००–३४८०० ग्रेडवेतन रु.४३००) | – | – | – | – | – | – | – | – | १ | १ |
| ९ | **वैद्यकीय अधिकारी** (पे बॅड रु.९३००–३४८०० ग्रेडवेतन रु.५४००) | – | – | – | १ | १ | १ | १ | – | – | ४ |

<u>वर्ग–३</u>

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | **ग्रंथपाल** (पे बॅड रु.५२००–२०२०० ग्रेडवेतन रु.२४००) | – | १ | – | – | – | – | – | – | – | १ |
| ११ | **लिपिक टंकलेखक तथा संगणकचालक** (पे बॅड रु.५२००–२०२०० ग्रेडवेतन रु.१९००)<br>**अनु.जमाती** (महिला–८, प्र.ग्रस्त–१, खेळाडू–१, मा.सैनिक–४, भुकंपग्रस्त–१, सर्वसाधारण–१३)<br>**विजा.(अ)** (महिला–३, प्र.ग्रस्त–१, खेळाडू–१, मा.सैनिक–२, सर्वसाधारण–३)<br>**भज.(क)** (महिला–३,प्र.ग्रस्त–१,खेळाडू–१, मा.सैनिक–२, सर्वसाधारण–४) | – | २८ * | १० * | – | ११ * | १ | – | – | – | ५० |
| १२ | **स्थानक अधिकारी** (पे बॅड रु.९३००–३४८०० ग्रेडवेतन रु.४३००) | – | १ | – | – | – | – | – | – | – | १ |
| १३ | **प्रोग्रामर** (पे बॅड रु.९३००–३४८०० ग्रेडवेतन रु.४३००) | – | १ | – | – | – | – | – | – | – | १ |
| १४ | **ड्राफ्टसमन (आरेखक)** (पे बॅड रु.९३००–३४८०० ग्रेडवेतन रु.४३००) | – | १ | – | – | – | – | – | – | – | १ |
| १५ | **सब फायर ऑफिसर** (पे बॅड रु.९३००–३४८०० ग्रेडवेतन रु.४२००) | १ | – | – | – | १ | – | – | – | – | २ |
| १६ | **क्ष–किरण तंत्रज्ञ** (पे बॅड रु.९३००–३४८०० ग्रेडवेतन रु.४२००) | – | १ | – | – | – | – | – | – | – | १ |
| १७ | **ड्रायव्हर–कम–ऑपरेटर** (पे बॅड रु.५२००–२०२०० ग्रेडवेतन रु.२४००) | १ | ३ | १ | – | १ | – | – | २ | – | ८ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | **लिडींग फायरमन**<br>(पे बॅड रु.५२००–२०२०० ग्रेडवेतन रु.२४००) | १ | ३ | १ | – | १ | – | – | २ | – | ८ |
| १९ | **इलेक्ट्रीशियन**<br>(पे बॅड रु.५२००–२०२०० ग्रेडवेतन रु.२४००) | – | १ | – | – | – | – | – | – | – | १ |
| २० | **सर्व्हेअर**<br>(पे बॅड रु.५२००–२०२०० ग्रेडवेतन रु.२४००)<br>**इ.मा.व.** (महिला–१, सर्वसाधारण–१) | – | १ | १ | – | १ | – | – | २ | – | ५ |
| २१ | **ट्रेसर (अनुरेखक)**<br>(पे बॅड रु.५२००–२०२०० ग्रेडवेतन रु.२०००) | – | २ | – | – | – | – | – | – | – | २ |
| २२ | **मेकॅनिक (डिझेल/पेट्रोल)**<br>(पे बॅड रु.५२००–२०२०० ग्रेडवेतन रु.१९००) | – | १ | – | – | – | – | – | – | – | १ |
| २३ | **वायरमन**<br>(पे बॅड रु.५२००–२०२०० ग्रेडवेतन रु.१९००)<br>**अनु.जमाती** (महिला–२, मा.सैनिक–१, सर्वसाधारण–४) | १ | ७<br>* | १ | १ | १ | १ | १ | – | – | १३ |
| २४ | **फायरमन**<br>(पे बॅड रु.५२००–२०२०० ग्रेडवेतन रु.१९००)<br>**अनु.जाती** (महिला–१)<br>**अनु.जमाती** (महिला–३,प्र.ग्रस्त–१,खेळाडू–१, मा.सैनिक–२)<br>**भ.ज.(क)** (महिला–१, सर्वसाधारण–२)<br>**भ.ज.(ड)** (महिला–१, सर्वसाधारण–१) | १<br>* | ७<br>* | १ | १ | ३<br>* | २<br>* | १ | – | – | १६ |
| २५ | **टेलिफोन ऑपरेटर**<br>(पे बॅड रु.५२००–२०२०० ग्रेडवेतन रु.१९००) | – | १ | – | – | – | – | – | – | – | १ |
| २६ | **मुख्य आरोग्य निरिक्षक**<br>(पे बॅड रु.९३००–३४८०० ग्रेडवेतन रु.४२००) | – | १ | – | – | – | – | – | – | – | १ |
| २७ | **स्टाफ नर्स**<br>(पे बॅड रु.९३००–३४८०० ग्रेडवेतन रु.४२००)<br>**अनु.जमाती** (प्र.ग्रस्त–१, खेळाडू –१, मा.सैनिक–२, सर्वसाधारण–८) | – | १२<br>* | १ | – | – | – | १ | – | – | १४ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८ | **प्रयोगशाळा चाचणी तंत्रज्ञ** (पे बॅड रु.९३००—३४८०० ग्रेडवेतन रु.४२००) | — | २ | — | — | — | — | — | — | — | **२** |
| २९ | **बहुउद्देशिय कामगार (M.P.W.)** (पे बॅड रु.५२००—२०२०० ग्रेडवेतन रु.२४००) | — | १ | — | — | — | — | — | — | — | **१** |
| ३० | **सहाय्यक परिचारीका प्रसविका** (पे बॅड रु.५२००—२०२०० ग्रेडवेतन रु.२४००) **अनु.जमाती** (प्र.ग्रस्त—१, खेळाडू —१, मा.सैनिक—१, सर्वसाधारण—५) | — | ८ * | १ | — | १ | १ | १ | — | — | **१२** |
| ३१ | **सार्वजनिक आरोग्य परिचारीका** (पे बॅड रु.९३००—३४८०० ग्रेडवेतन रु.४३००) | १ | १ | — | — | — | — | — | १ | — | **३** |
| ३२ | **लेखापाल** (पे बॅड रु.९३००—३४८०० ग्रेडवेतन रु.४३००) | १ | १ | — | — | — | — | — | — | — | **२** |
| ३३ | **वरिष्ठ लेखा परिक्षक** (पे बॅड रु.९३००—३४८०० ग्रेडवेतन रु.४३००) | १ | १ | — | — | — | — | — | १ | — | **३** |

वर्ग—४

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३४ | **थिएटर अटेंडंट** (पे बॅड रु.४४४०—७४४० ग्रेडवेतन रु.१६००) | — | १ | — | — | — | — | — | — | — | **१** |
| ३५ | **प्लंबर** (पे बॅड रु.५२००—२०२०० ग्रेडवेतन रु.१८००) | — | १ | — | — | — | — | — | — | — | **१** |
| ३६ | **गवंडी** (पे बॅड रु.५२००—२०२०० ग्रेडवेतन रु.१८००) | — | १ | — | — | — | — | — | — | — | **१** |

**( प्र.ग्रस्त = प्रकल्पग्रस्त, मा.सैनिक = माजी सैनिक )**

## ➢ शैक्षणिक अर्हता व अनुभव :—

### ❖ वर्ग—१ मधील पदे :

**१)वैद्यकीय आरोग्य अधिकारी :—**

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची वैद्यक शास्त्रातील M.B.B.S., D.P.H. परिक्षा उत्तीर्ण. M.D.(P.S.M.) उमेदवारास प्राधान्य देण्यांत येईल.

ब) शासन/केंद्रशासन/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील सहा आरोग्य अधिकारी वा तत्सम पदावरील किमान ७ वर्षाचा पर्यवेक्षीय व कार्यकारी पदाचा अनुभव आवश्यक,

क) रुग्णालयातील प्रशासन, सार्वजनिक आरोग्य व प्रतिबंधात्मक उपचारात्मक बाबी समर्थपणे हाताळण्याचा व विशेषत: स्वच्छता पर्यवेक्षण, साथ आजार निर्मूलन कार्यक्रम, हिवताप नियंत्रण आदि बाबींच्या कार्याचा किमान ५ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य.

**२) मुख्य वैद्यकीय अधिकारी :–**

अ) उमेदवार वैद्यकशास्त्रातील कोणत्याही शाखेतील पदव्युत्तर पदवी आणि,

ब) १०० पेक्षा अधिक बेडस् असलेल्या एखाद्या रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी म्हणून कामकाजाचा ५ वर्षपेक्षा कमी नसेल इतका अनुभव असावा.

**३) सिस्टीम मॅनेजर :–**

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची संगणक अभियांत्रिकीमधील पदवी (B.E. Computer) किंवा समकक्ष अर्हता आणि,

ब) डेटा सेंटर ॲडमिनीस्ट्रेशन, नेटवर्किंग (लॅन, वॅन, Componunt) हार्डवेअर मधील ५ वर्षाचा अनुभव.

**४) प्रकल्प व्यवस्थापक तथा आर.सी.एच.ऑफिसर :–**

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची वैद्यक शास्त्रातील पदवी परिक्षा (M.B.B.S., PSM./DPH.) उत्तीर्ण आणि,

ब) महानगरपालिकेत मुख्य वैद्यकीय अधिकारी पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक.

**❖ वर्ग–२ मधील पदे :**

**५) प्रभाग क्षेत्र अधिकारी :–**

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील L.G.S. परीक्षा उत्तीर्ण, आणि

ब) राज्य शासनाकडील मुख्य लिपिक किंवा समकक्ष पदावरील किंवा कोणत्याही महापालिका आस्थापनेवरील अधिक्षक या पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव

**६) उप कर निर्धारक व संकलक :–**

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी

ब) स्थापत्य अभियात्रिकी शाखेतील (बी.ई.सिव्हील) पदवीधारकास प्राधान्य.

**७) उप सचिव :–**

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी आणि एल.जी.एस. परिक्षा उत्तीर्ण.

ब) विधी शाखेच्या पदवीधरास प्राधान्य.

**८) सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी :–**

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची शास्त्र विषयाची पदवी धारण केलेली असावी.

ब) अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेमधून स्वच्छता निरीक्षक ही परीक्षा उत्तीर्ण असावा.

क) कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेमधील आरोग्य विभागाकडील ५ वर्षपेक्षा कमी नसेल इतका अनुभव असावा

**९) वैद्यकीय अधिकारी :–**

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची एम.बी.बी.एस. पदवी आणि,

ब) शासकीय/निमशासकीय/खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील ३ वर्षाचा अनुभव.

क) महाराष्ट्र मेडिकल काऊंसिल अधिनियम अंतर्गत नोंदणी आवश्यक.

❖ **वर्ग–३ मधील पदे :**

१०) **ग्रंथपाल** :–

अ) मान्यताप्राप्त विदयापीठाची ग्रंथालय (B.Lib) पदवी

ब) पदव्युत्तर पदवी (M.Lib) असल्यास प्राधान्य .

क) शासकीय,निमशासकीय, शैक्षणिक संस्थामधील अनुभवास प्राधान्य.

११) **लिपिक टंकलेखक तथा संगणकचालक** :–

अ) एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण आणि,

ब) राज्य शासनाची मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. (G.C.C.)/इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण

क) महाराष्ट्र राज्य उच्च व तत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आणि,

ड) मराठी लिहिता, बोलता व वाचता येणे आवश्यक.

१२) **स्थानक अधिकारी** :–

अ) उमेदवार विज्ञान रसायनशास्त्र शाखेतील पदवी धारण करणारा असावा, आणि

ब) देशातील कोणत्याही राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालय/विद्यापिठ येथून केंद्र अधिकारी हा पाठ्यक्रम उत्तीर्ण झालेला असावा, किंवा

क) देशातील कोणत्याही राष्ट्रीय अग्निशमन विद्यालय/विद्यापिठ येथून अग्निशमन अभियात्रिकी मधील पदवी धारण केलेला असावा.

ड) ५ लाखापेक्षा कमी लोकसंख्या नसलेल्या शहरातील कोणत्याही प्राधिकरणातील उप स्थानक अधिकारी/स्थानक अधिकारी म्हणून ३ वर्षापेक्षा कमी नसेल एवढा अनुभव असावा.

१३) **प्रोग्रामर** :–

अ) संगणक अभियांत्रिकी किंवा संगणक शास्त्र यामधील पदवी किंवा संगणक किंवा संगणक व्यवस्थापक किंवा संगणकाचा वापर यामधील पदव्युत्तर पदवीकाधारक आणि

ब) प्रोग्रामर म्हणून २ वर्षापेक्षा कमी नसेल इतका अनुभव.

१४) **ड्राफ्टसमन** :–

अ) राज्य माध्यमिक/उच्च माध्यमिक शालांत शिक्षण मंडळाची परिक्षा उत्तीर्ण.

ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा अनुरेखक अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.

१५) **सब फायर ऑफिसर** :–

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची रसायनशास्त्र या विषयासह विज्ञान शाखेची पदवी आणि,

ब) राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालय नागपूर येथील उप स्थानक अधिकारी पाठ्यक्रम पूर्ण आणि,

क) शारीरीक पात्रता–उंची–१६५ सें.मी.,वजन–५० किलो,छाती–८१ सें.मी.,फुगवून–८६सें.मी., दृष्टी–चांगली.

१६) **क्ष–किरण तंत्रज्ञ** :–

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची भौतिक शास्त्र या विषयासह विज्ञान शाखेची पदवी आणि,

ब) शासन मान्यताप्राप्त संस्थेतून “क्ष–किरण तंत्रज्ञ” या विषयाचे प्रशिक्षण पूर्ण

क) वैद्यकीय प्रयोगशाळेतील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.

१७) <u>ड्रायव्हर–कम–ऑपरेटर</u> :–

अ) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र उत्तीर्ण. आणि

ब) मोटर वाहन अधिनियम १९८८ अन्वये अवजड वाहन परवाना धारण करणे आवश्यक, आणि

क) अवजड मोटर वाहने चालविण्याचा आणि देखभाल करण्याचा किमान ५ वर्षापेक्षा कमी नसेल इतका अनुभव.

१८) <u>लिडीग फायरमन</u> :–

अ) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण. आणि,

ब) शासकीय किंवा निमशासकीय सेवेतील फायरमन या पदावरील कामाचा ५ वर्षापेक्षा कमी नसेल इतका अनुभव असावा आणि,

क) शारीरीक पात्रता–उंची–१६५ सें.मी.,वजन–५० किलो,छाती–८१ सें.मी.,फुगवून–८६सें.मी. ,दृष्टी–चांगली

१९) <u>इलेक्ट्रीशियन</u> :–

अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालात परीक्षा उत्तीर्ण आणि,

ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे वीजतंत्री या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र

२०) <u>सर्व्हेअर</u> :–

अ) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा,

ब) उमेदवार मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून “सर्व्हेअर” प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा,

क) सर्व्हेअर म्हणून किमान दोन वर्षाचा अनुभव.

२१) <u>ट्रेसर (अनुरेखक)</u> :–

अ) राज्य माध्यमिक/उच्च माध्यमिक शालांत शिक्षण मंडळाची  परिक्षा उत्तीर्ण,

ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा अनुरेखक व तत्सम समतुल्य अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र.

२२) <u>मेकॅनिक (डिझेल/पेट्रोल)</u> :–

अ) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण, आणि,

ब) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने आयोजित केलेला यांत्रिक (पेट्रोल व डिझेल) पाठ्यक्रम उत्तीर्ण झालेला असावा, आणि,

क) पेट्रोल/डिझेलवर चालणारी मोटार वाहने दुरुस्त करण्याचा २ वर्षापेक्षा कमी नसेल इतका अनुंभव असावा.

२३) <u>वायरमन</u> :–

अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि,

ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे तारतंत्री या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.

२४) <u>फायरमन</u> :–

अ) एस.एस.सी. आणि राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्रामधून फायरमन कोर्स उत्तीर्ण.

ब) शारीरीक पात्रता –– उंची–१६५ सें.मी., वजन–५० किलो, छाती–८१ सें.मी., फुगवून–८६ सें. मी., दृष्टी–चांगली. (महिला उमेदवारांसाठी शासनाप्रमाणे निर्धारीत केलेली शारीरीक पात्रता ग्राह्य धरणेत येईल.)

२५) **टेलिफोन ऑपरेटर** :–

अ) महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि,

ब) शासनमान्य संस्थेचा वा शासकीय आय.टी.आय. चा टेलिफोन ऑपरेटरचा अभ्यासक्रम पुर्ण.

क) मराठी, हिंदी व इंग्रजी संभाषण करण्याचा सराव आवश्यक.

२६) **मुख्य आरोग्य निरिक्षक** :–

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी, आणि स्वच्छता निरीक्षक पदविका आणि,

ब) कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेमधील उप मुख्य स्वच्छता अधिकारी या संवर्गातील किमान ५ वर्षाचा अनुभव

क) शास्त्र शाखेची पदव्युत्तर पदवी आणि अथवा L.G.S. परीक्षा उत्तीर्ण असलेल्या उमेदवारास प्राधान्य.

२७) **स्टाफ नर्स** :–

अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी विज्ञान शाखेतील परीक्षा उत्तीर्ण आणि,

ब) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका आणि,

क) शासकीय/निमशासकीय खाजगी रुग्णालयातील परिचारीका म्हणून ३ वर्षाचा अनुभव आवश्यक आणि

ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक.

२८) **प्रयोगशाळा चाचणी तंत्रज्ञ** :–

अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची रसायनशास्त्र /जीवशास्त्र वा सुक्ष्मजीवशास्त्र या विषयातील पदवी,

ब) मान्यताप्राप्त संस्थेची डी.एम.एल.टी. परिक्षा उत्तीर्ण,

क) वैद्यकीय प्रयोगशाळेतील किमान तीन वर्षाचा अनुभव.

२९) **बहुउद्देशिय कामगार (एम.पी.डब्ल्यू.)** :–

अ) किमान एच.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थाकडील स्वच्छता निरीक्षक अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक आहे,

ब) शासनमान्य विद्यापिठाची पदवी विशेषत: शास्त्र शाखेची पदवी आणि एलएसजीडी. परीक्षा उत्तीर्ण असलेल्या उमेदवारास प्राधान्य,

क) स्वच्छता निरीक्षक म्हणून अनुभव असल्यास विशेष प्राधान्य.

**३०) सहाय्यक परिचारीका प्रसविका** :–

अ) महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि,

ब) शासन मान्यताप्राप्त संस्थेचा ए.एन.एम. अभ्यासक्रम पूर्ण व त्यानंतर कामाचा २ वर्षाचा अनुभव आवश्यक आणि,

क) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक.

**३१) सार्वजनिक आरोग्य परिचारीका** :–

अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी विज्ञान शाखेतील परीक्षा उत्तीर्ण आणि,

ब) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका आणि,

क) पब्लिक हेल्थ नर्सिंग या विषयाचा शासनमान्य अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र.

ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक आणि,

इ) असा अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर परिचारीका म्हणून ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.

**३२) लेखापाल** :–

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी परिक्षा उत्तीर्ण आणि,

ब) उपलेखापाल, वरिष्ठ लेखा परिक्षक, कार्यालय अधिक्षक या पदावरील ७ वर्षाचा कामाचा अनुभव आवश्यक.

**३३) वरिष्ठ लेखा परिक्षक** :–

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी परिक्षा उत्तीर्ण आणि,

ब) कनिष्ठ लेखा परिक्षक या पदावरील ७ वर्षाचा कामाचा अनुभव आवश्यक.

❖ **वर्ग–४ मधील पदे**

**३४) थिएटर अटेंडंट** :–

अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची विज्ञान शाखेतील जीवशास्त्र विषयासह १२ वी परिक्षा उत्तीर्ण आणि

ब) शासकीय/निमशासकीय रुग्णालयातील शस्त्रक्रियागृह सहाय्यक कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.

**३५) प्लंबर** :–

अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परिक्षा उत्तीर्ण

ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नळ कारागीर या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.

क) सबंधित कामाचा ३ वर्षाचा अनुभव.

**३६) गवंडी** :–

अ) मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा अभ्यासक्रम उत्तीर्ण.

**१) नियुक्ती कालावधी** :– प्रथमत: दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी (परिविक्षाधीन कालावधीतील काम समाधानकारक असल्यास सेवेत नियमित करणेचा विचार केला जाईल)

**२) वयोमर्यादा दि.०१/११/२०११ रोजी**............

अ) अनु.जाती, अनु.जमाती, विजाभज., विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांचे किमान वय १८ वर्षे पूर्ण आणि कमाल वय ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

ब) माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, खेळाडू उमेदवारांना शासन नियमानुसार वयोमर्यादा शिथिलक्षम असेल

क) वैद्यकीय आरोग्य अधिकारी, प्रभाग क्षेत्र अधिकारी, उप कर निर्धारक व संकलक, उप सचिव या पदांसाठी कमाल वयोमर्यादा ४० वर्षे राहील.

३) ज्या पदासाठी अनुभव आवश्यक आहे अशा पदांच्या बाबतीत अनुभव हा शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडील असणे आवश्यक आहे.

४) प्रत्येक पदासाठी विहित केलेला नमुना अर्ज **M.K.C.L.** च्या संबंधित अधिकृत प्रशिक्षण केंद्र (**Authorised Learning Centre) ALC.** वर उपलब्ध होतील. उमेदवाराने अर्ज परिपूर्ण भरुन अर्जावर विहित ठिकाणी पासपोर्ट साईज फोंटो लावून व स्वाक्षरी करुन अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह **M.K.C.L.** च्या अधिकृत प्रशिक्षण केंद्राकडेच **(ALC)** **दिनांक ७/१२/२०११ अखेर सायंकाळी ५.३० पर्यत दाखल करणेचे आहेत.** अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. **M.K.C.L.** च्या अधिकृत प्रशिक्षण केंद्राची **(ALC)** यादी **http://oasis.mkcl.org/kdmc2011** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

५) <u>**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**</u> :– उमेदवार एकापेक्षा अधिक पदाकरितां अर्ज करणार असल्यास प्रत्येक पदासाठी विहित नमुन्यात स्वतंत्र अर्ज करणेचा आहे व अर्जासोबत पदासाठी विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे कागदपत्रे, वयाचा पुरावा, अनुभवाचे प्रमाणपत्र, डोमिसाईल प्रमाणपत्र, तसेच समांतर आरक्षणातून अर्ज असल्यास माजी सैनिकाचे प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, भुकंपग्रस्त प्रमाणपत्र, खेळाडू प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती जोडण्याच्या आहेत.

मागासवर्गीय प्रवर्गातील पदांसाठी अर्ज करताना अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र अथवा जात प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अर्ज दाखल केल्यानंतर कोणतीही जादा कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत. तसेच मुलाखतीसाठी पात्र ठरविण्यांत आलेल्या उमेदवारांनी मुलाखतीचे वेळी त्यांचे मुळ शैक्षणिक कागदपत्रे, वयाचा दाखला, अनुभवाचे प्रमाणपत्र, डोमिसाईल प्रमाणपत्र, तसेच समांतर आरक्षणातून अर्ज असल्यास माजी सैनिकाचे प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, भुकंपग्रस्त प्रमाणपत्र, खेळाडू प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्रांच्या मुळप्रतीं व त्यांच्या सत्यप्रतीसह हजर राहणेचे आहे. अन्यथा मुलाखतीस अपात्र ठरविले जाईल.

६) <u>**परिक्षा शुल्क**</u> :– वर्ग–१ व वर्ग–२ मधील पदांच्या परिक्षेकरितां असणारे शुल्क खुला प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.२००/– व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.१५०/– <u>प्रती अर्ज</u> असेल.

वर्ग–३ व वर्ग ४ मधील पदांच्या परिक्षेकरितां असणारे शुल्क प्रत्येक उमेदवारांसाठी रु. १००/–प्रती अर्ज असेल. परिपूर्ण अर्जासोबत परिक्षा शुल्क रोख स्वरुपात स्विकारण्याची सोय **M.K.C.L.** च्या अधिकृत प्रशिक्षण केंद्रावर **(ALC)** करण्यांत आलेली आहे. परिक्षा शुल्क नापरतावा राहील. त्याची पोहच व भरलेल्या अर्जाचा गोषवारा तक्ता सदर अधिकृत प्रशिक्षण केंद्राकडून दिला जाईल. परिक्षा शुल्क व्यतिरिक्त अर्जाची किंमत रु. १५/– राहील.

७) लेखी परिक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना सदर पदासाठी घेण्यांत येणाऱ्या परिक्षेचे प्रवेशपत्र, वेळा पत्रक, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादीबाबतची माहिती **M.K.C.L.** च्या ज्या त्या संबंधित अधिकृत प्रशिक्षण केंद्राकडून **(ALC)** उपलब्ध होईल.

८) <u>**लेखी परिक्षेचे स्वरुप आणि गुणांचा तपशिल खालीलप्रमाणे**</u> :–

- **वर्ग १, २, ३ व ४ मधील कोणत्यांही एका पदासाठी केवळ ५ किंवा त्यापेक्षा कमी प्रमाणात अर्ज आल्यास लेखी परीक्षा घेण्यात येणार नाही.**
- **वर्ग–४** मधील पदासाठी लेखी परिक्षा घेण्यांत येणार नाही. किमान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या गुणानुक्रमे मुलाखतीसाठी यादी निश्चित करणेत येईल. **प्रत्यक्ष मुलाखत १०** गुणांची असेल.
- **अन्यथा लेखी परीक्षा घेण्यात येईल. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

✓ <u>**वर्ग–१ मधील सर्व पदे आणि वर्ग–२ मधील वैद्यकीय अधिकारी या पदांसाठी**</u>

<u>**पेपर पहिला**</u> – सामान्यज्ञान **एकूण ९० गुण** (प्रत्येकी २ गुणांचे ४५ बहुपर्यायी प्रश्न) कालावधी–१ तास अभ्यासक्रम –– महाराष्ट्राचा इतिहास, महाराष्ट्राचा भुगोल, विज्ञान, अर्थव्यवस्था, पंचवार्षिक योजना, महाराष्ट्राचे समाजसुधारक, बुध्दीमापन चाचणी, पंचायत राज, चालू घडामोडी इत्यादी

<u>**पेपर दुसरा**</u> – विषयाचे ज्ञान (पदवी स्तरावरील संबंधित विषयाचे ज्ञान) **एकूण ९० गुण** (प्रत्येकी २ गुणांचे ४५ बहुपर्यायी प्रश्न) कालावधी–१ तास

**प्रत्यक्ष मुलाखत २० गुण.**

✓ <u>वर्ग–२ मधील  वैद्यकीय अधिकारी या पदांव्यतिरिक्त पदे</u>

<u>पेपर</u> – सामान्य ज्ञान **एकूण ९० गुण** (प्रत्येकी १ गुणाचे ९० बहुपर्यायी प्रश्न) कालावधी–२ तास.

अभ्यासक्रम –– महाराष्ट्राचा इतिहास, महाराष्ट्राचा भुगोल, विज्ञान, अर्थव्यवस्था, पंचवार्षिक योजना, महाराष्ट्राचे समाजसुधारक, बुध्दीमापन चाचणी, पंचायत राज, चालू घडामोडी इत्यादी

**प्रत्यक्ष मुलाखत १० गुण.**

✓ <u>वर्ग–३ मधील खालीलप्रमाणे ९ पदे</u>

"ग्रंथपाल, स्थानक अधिकारी, प्रोग्रामर, सब फायर ऑफिसर, क्ष–किरण तंत्रज्ञ, मुख्य आरोग्य निरिक्षक, प्रयोगशाळा चाचणी तंत्रज्ञ, लेखापाल, वरिष्ठ लेखा परिक्षक"

**पेपर**– पदवी स्तरावरील सामान्यज्ञान **एकूण ९० गुण** (प्रत्येकी १ गुणाचे ९० बहुपर्यायी प्रश्न) कालावधी– २ तास

अभ्यासक्रम –– महाराष्ट्राचा इतिहास, महाराष्ट्राचा भुगोल, विज्ञान, अर्थव्यवस्था, पंचवार्षिक योजना, महाराष्ट्राचे समाजसुधारक, बुध्दीमापन चाचणी, पंचायत राज, चालू घडामोडी इत्यादी

**प्रत्यक्ष मुलाखत १० गुण.**

✓ <u>वर्ग–३ मधील खालीलप्रमाणे १५ पदे</u>

"लिपिक टंकलेखक तथा संगणकचालक, ड्राफ्टसमन, ड्रायव्हर–कम–ऑपरेटर, लिडींग फायरमन, इलेक्ट्रीशियन, सर्व्हेअर, ट्रेसर, मेकॅनिक (डिझेल/पेट्रोल), वायरमन, फायरमन, टेलिफोन ऑपरेटर, स्टाफ नर्स, बहुउद्देशिय कामगार, सहाय्यक परिचारीका प्रसविका, सार्वजनिक आरोग्य परिचारीका"

**पेपर** – महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा स्तरावरील सामान्य ज्ञान **एकूण ९० गुण** (प्रत्येकी १ गुणाचे ९० बहुपर्यायी प्रश्न) कालावधी–२ तास.

अभ्यासक्रम –– इतिहास, भुगोल, विज्ञान, अर्थशास्त्र, गणित, नागरीकशास्त्र, बुध्दीमापन चाचणी, चालू घडामोडी इ.

**प्रत्यक्ष मुलाखत १० गुण.**

➢ <u>अटी/शर्ती</u> :–

१) विहीत नमुन्यातील अर्ज **M.K.C.L.** च्या संबधित अधिकृत प्रशिक्षण केंद्रावर (**ALC**) उपलब्ध आहेत. या (**ALC**) ची यादी http:\\oasis.mkcl.org/kdmc 2011 या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

२) रिक्त पदांची उपलब्धता आणि रिक्त पदांच्या संख्येत/वर नमुद केलेल्या पदसंख्येत बदल होऊ शकतो.गरजांनुसार नेमणूका केल्या जातील.

३) कल्याण डोंबिवली महानगरपालिका सेवेत, तसेच शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे अथवा सरकारी उपक्रम इत्यादी कार्यालयात असलेल्या व्यक्तींना वर नमूद केलेल्या पदांकरितां अर्ज करावयाचा असेल तर त्याने त्याच्या खात्यामार्फत विहित मुदतीत आणि विहित नमुन्यात अर्ज **M.K.C.L.** च्या अधिकृत प्रशिक्षण केंद्राकडेच **(ALC)** सादर करणे आवश्यक आहे.

४) खेळाडूचे आरक्षित पद महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र. राक्रीधो– २००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे–२, दि.३० एप्रिल, २००५ मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार भरणेत येईल.

५) वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज.(ड) या प्रवर्गाकरितां विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय राहील.

६) ज्या मागासवर्गीय उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नाही अशा उमेदवारांची निवड झाल्यास अशा उमेदवारांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर केल्याशिवाय त्यांना नियुक्ती दिली जाणार नाही.

७) इतर राज्यांतून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरित झालेल्या उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. उमेदवाराने महाराष्ट्रात १५ वर्ष अधिवास **(Domicile)** करत असल्याबाबत सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच अर्जदारास मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

८) उमेदवाराने जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नांव नोंदणी केलेली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

९)उमेदवारांना लेखी परिक्षा/मुलाखतीसाठी नियोजित स्थळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल व यासंदर्भात कोणताही भत्ता देय राहणार नाही.

१०)निवड प्रक्रिया सुरु झाल्यावर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/ कागदपत्रे सादर केल्याचे किंवा माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यांत येईल. तसेंच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.

११)निवड समितीने तयार केलेली प्रत्येक पदासाठी असलेली निवड सूचीची विधी ग्राह्यता **(Validity)** निवडीच्या तारखेपासून एक वर्षाची राहील. त्यानंतर ही निवडसूची नियमाप्रमाणे व्यपगत होईल.

१२)माजी सैनिकांसाठी राखीव असलेल्या पदांसाठी अर्ज केलेल्या माजी सैनिक उमेदवारांनी अर्जासोबत शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या प्रतींबरोबरच सैनिक सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या प्रमाणपत्राची प्रमाणित छायाप्रत जोडावी, अन्यथा त्यांचा अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१३)प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त प्रवर्गासाठी राखीव पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संबंधित जिल्हयातील जिल्हाधिकारी/जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेकडील प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडावयाच्या आहेत अन्यथा अर्ज अपात्र समजणेत येईल. तसेच प्रमाणपत्र पडताळणीनंतर नियुक्ती आदेश देण्यांत येतील.

१४)सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना दि.२८ मार्च, २००५ आणि शासन परिपत्रक दि.१ जुलै, २००५ मधील सुचनांनुसार लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे.

१५)स्त्री उमेदवारांनी विवाहानंतर नावात बदल झाला असल्यास त्याबाबतचे शासन राजपत्र अथवा इतर पुरावा सोबत जोडणे आवश्यक आहे.

१६)निवड होणाऱ्या उमेदवाराला महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अंनियो/१००५/१२६/ सेवा–४, दि.३१/१०/२००५ अन्वये नवीन "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू होईल.

१७)शासन वेळोवेळी आदेश काढून निश्चित करेल असे संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान एक अतिरिक्त आवश्यक अर्हता राहील.

१८)निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र उमेदवाराने संबंधित पोलिस स्टेशनकडून सादर करणे आवश्यक आहे.

१९)जर एखादया उमेद्वाराने भरतीच्या कोणत्याही टप्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनूचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यांत येईल.

२०)जाहिरातीत नमूद केलेली पदसंख्या, आरक्षण, समांतर आरक्षण अथवा इतर बाबींमध्ये बदल करणे, तसेच जाहिरातीतील कोणत्याही पदासाठी केलेला अर्ज/सर्व अर्ज, सदर भरती प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा बदल करणे अथवा जाहिरातीनुसार होणारी भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार आयुक्त, क.डों.म.पा., कल्याण यांना असतील. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

आयुक्त,<br>
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,<br>
कल्याण करिता.